महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/मभाक/न.क्र.२०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.६५ (मभाक), दिनांक १७.७.२००६

विषय : इंग्रजी लघुलेखन व इंग्रजी टंकलेखन या संवर्गातील कर्मचाऱ्यांना तसेच, निम्नस्तर लिपिक नि टंकलेखक (इंग्रजी) यांना शासनाच्या एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखनाची परीक्षा सक्तीने उत्तीर्ण करण्याबाबत मुदतवाढ देणे.

संदर्भ : १) परिपत्रक क्र.९४ (मभाक), दिनांक २९.९.९७
२) परिपत्रक क्र.१०४ (मभाक), दिनांक ६.६.२००२
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७० (मभाक), दि.१७.८.२००२

--------

संदर्भिय परिपत्रक क्र.१ अनुसार तत्कालीन म.रा.वि.मंडळातील इंग्रजी लघुलेखन व इंग्रजी टंकलेखन या संवर्गातील कर्मचाऱ्यांना तसेच नि.लिपिक नि टंकलेखक (इंग्रजी) यांना मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखनाचे प्रशिक्षण घेऊन शासनाच्या एतदर्थ मंडळाची मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करणे सक्तीचे करण्यात आले होते. सदर परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी विहित केलेली चार वर्षांची मुदत दिनांक २९ सप्टेंबर २००१ रोजी पूर्ण झाल्याने संदर्भिय क्र.२ चे परिपत्रक क्र.१०४ (मभाक), दिनांक ६.६.२००२ अन्वये, परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी, परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा परीक्षा उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळण्यास संबंधित कर्मचारी पात्र ठरेपर्यंत रोखून धराव्यात अशा सूचना प्रसृत करण्यात आल्या होत्या. त्यानंतर प्रशासकीय परिपत्रक क्र.३७० (मभाक), दि.१७.८.२००२ अन्वये मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करण्याकरिता, दि.२९ सप्टेंबर २००५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली . तरीसुध्दा १०४ कर्मचारी सदर परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत.

२. दरम्यान ६.६.२००५ रोजी म.रा.वि.मंडळाचे तीन कंपन्यांत विभाजन होऊन कंपनीच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल झाल्याने सदर परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी निवेदने/मागणी कर्मचा-यांनी तथा संघटनांनी केली होती. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन संबंधित लघुलेखकांना व टंकलेखकांना प्रस्तुत परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मुदत वाढवून देण्याची बाब कंपनी प्रशासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वकष विचार करून व्यवस्थापकिय संचालक (म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित ) यांनी खालील बाबींना मंजुरी दिली आहे.

अ) संबंधित कर्मचा-यांनी यापुढे फक्त मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होणे सक्तीचे राहील. तसेच दिनांक २९.९.२००५ रोजी किंवा त्या अगोदर वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेले संबंधित कर्मचारी मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळण्यास पात्र राहतील.”

ब) "दिनांक २९.९.२००५ च्या अगोदरपासूनच सेवेत असलेल्या ज्या कर्मचाऱ्यांना वर 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली नसतील त्या संबंधित कर्मचा-यांना मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात येत आहे. म्हणजेच सदर कर्मचा-यांना दि.२९.९.२००७ पर्यंत मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील. अन्यथा दि.२९.९.२००७ नंतर त्यांना देय असलेली नियत वेतनवाढ सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यंत रोखून धरण्यात येईल.

३. उपरोक्त तरतुदीनुसार संबंधित कर्मचाऱ्यांच्या रोखून धरलेल्या वेतनवाढी नियत वेतनवाढीच्या तारखेपासून देय करण्याबाबत संबंधित अधिका-यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

४. उपरोक्त सूचना सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यांच्याकडून तशी पोचपावती घेण्यात यावी.

५. सदर परिपत्रकातील तरतुदी म.रा.वि. वितरण कंपनीच्या संबंधित कर्मचाऱ्यांना लागू होतील.

(स्वाक्षरी) २१/१२/०६

(सु.य.पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत

१) क्षेत्रीय कार्यालयातील विभागीय आणि त्यावरील स्तरांच्या कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.
२) महावितरण कंपनीच्या निगम कार्यालयातील सर्व विभाग/गट/कक्ष प्रमुख.